केंद्र पुरस्कृत स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत कार्यरत विशेष उद्देश वाहन (SPV) व अधिकारी/ कर्मचारी यांचे बाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : स्मार्टसि-०२२६/प्र.क्र.१८/नवि-३२**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : २२ एप्रिल, २०२६.**

**संदर्भ :** १) नगर विकास विभाग निर्णय क्रमांक स्मार्टसि-२०१६/अनौस-५८/प्र.क्र.२६१/नवि-२३ दि.१८.०६.२०२१६

२) अवर सचिव, केंद्रीय गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय यांचे पत्र क्रमांक K-१४०१२/१०१(०४)/२०२१-SC-III-A (९१०३८७०) दि. २९.०६.२०२४

३) शासन पत्र क्र. स्मार्टसि-०१२५/प्र.क्र.१३/नवि-३२ दिनांक २७.०३.२०२५

४) संचालक, स्मार्ट सिटी मिशन, केंद्रीय गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय यांचे पत्र क्रमांक K-१५०१६/६/२०२४-SC-I/US-II दि. १०.०६.२०२५

**प्रस्तावना-**

स्मार्ट सिटीच्या विशेष उद्देश वाहन (SPV) ची स्थापना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना क्र.१०.६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६६(अ) व ६६ (४१ - अ) च्या तरतुदीनुसार करण्यात आली असून सदर विशेष वाहनाच्या संरचना व कार्यपद्धतीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार वेळोवेळी निर्देश देण्याचे अधिकार राज्य शासनाकडे असतील अशी नगर विकास विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये तरतूद करण्यात आली आहे. तसेच Article of Association मध्ये काहीही नमूद केलेले असले तरी केंद्र शासन,राज्य शासनाने दिलेल्या सूचना,निर्देश,आदेश सदर विशेष उद्देश वाहन वर बंधनकारक राहतील (Over Riding Effect) अशी तरतूद Article of Association मध्ये करणेबाबत ही सदर शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

केंद्र शासनाने संदर्भाधिन क्र. २ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानूसार स्मार्ट सिटी मिशनचा कालावधी संपून बराच कालावधी उलटला असल्याने व त्यापुढील कालावधीत सदर अभियानाकरिता केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होणार नसल्याने तसेच स्मार्ट सिटी स्मार्ट अभियानांतर्गतचे प्रकल्प डिसेंबर,२०२५ पर्यंत पूर्ण करण्याची केंद्र शासनाने दि. ७ एप्रिल,२०२५ च्या बैठकीत व संदर्भाधिन क्र. ३ च्या कार्यालयीन ज्ञापनाव्दारे दिलेली कालमर्यादाही संपुष्टात आल्याने केंद्र पुरस्कृत स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत कार्यरत विशेष उद्देश वाहन (SPV) व इतर संचालक यांचेबाबत व अधिकारी/ कर्मचारी यांच्याबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

अध्यक्ष, स्मार्ट सिटी SPV व इतर संचालक, स्मार्ट सिटी SPV यांना कार्यमुक्त करुन त्यांचे अधिकार संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्त यांचेकडे देण्यात येत आहे.तसेच स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार देखील संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त किंवा अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे देण्यात येत आहे.

२. त्यानुसार स्मार्ट सिटीच्या SPV वर कार्यरत अध्यक्ष व इतर संचालक यांचे अधिकार खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **स्मार्ट सिटीचे नाव** | **SPV अध्यक्षाचे नाव व मूळ पदनाम** | **या शासन निर्णयानुसार SPV अध्यक्षाचे व इतर संचालक यांचे अधिकार देण्यात आलेल्या अधिका-याचे नाव व मूळ पदनाम** |
|---|---|---|---|
| १. | नागपूर | श्री. संजय मुखर्जी,भा.प्र.से. आयुक्त, MMRDA मुंबई | श्री.बिपीन ईटनकर, भाप्रसे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका |
| २. | नाशिक | रिक्त | श्रीम.मनीषा खत्री, भाप्रसे, आयुक्त, नाशिक महानगरपालिका |
| ३. | पुणे | श्री. चंद्रकांत पुलकुंडवार, भाप्रसे, विभागीय आयुक्त, पुणे | श्री.नवलकिशोर राम, भाप्रसे, आयुक्त, पुणे महानगरपालिका |
| ४. | पिंपरी चिंचवड | श्री. चंद्रकांत पुलकुंडवार, भा.प्र.से., विभागीय आयुक्त, पुणे | श्री. विजय सूर्यवंशी,भाप्रसे, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका |
| ५. | ठाणे | डॉ. के.एच. गोविंदराज,भा.प्र.से, अति. मुख्य सचिव (नवि-२) | श्री. सौरभ राव ,भाप्रसे, आयुक्त, ठाणे महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | कल्याण डोंबिवली | श्री. संजीव जैसवाल, भा.प्र.से, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा | श्री.अभिनव गोयल, भाप्रसे, आयुक्त, कल्याण -डोंबिवली महानगरपालिका |
| ७. | सोलापूर | श्री.असीमकुमार गुप्ता, भा.प्र.से, अति. मुख्य सचिव (नवि-१) | श्री. सचिन ओंबासे. भाप्रसे, आयुक्त, सोलापूर महानगरपालिका |
| ८. | औरंगाबाद/ छ.संभाजीनगर | श्रीम.विनिता सिंगल, भा.प्र.से, प्रधान सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग. | श्री. अमोल येडगे भाप्रसे, आयुक्त, छ.संभाजीनगर महानगरपालिका |

तसेच स्मार्ट सिटीच्या SPV चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा अधिकार खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **स्मार्ट सिटीचे नाव** | **SPV मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे नाव** | **या शासन निर्णयानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार देण्यात आलेल्या अधिका-याचे नाव व मूळ पदनाम** |
|---|---|---|---|
| १. | नागपूर | श्री.अंकित, भा.प्र.से अतिरिक्त आयुक्त, नागपूर महानगरपालिका (अति. कार्यभार) | श्री.अंकित, भा.प्र.से., अतिरिक्त आयुक्त, नागपूर महानगरपालिका |
| २. | नाशिक | श्री. सुमंत मोरे, सह आयुक्त,म.श.प्र.से. | श्रीम.मनीषा खत्री, भाप्रसे, आयुक्त, नाशिक महानगरपालिका |
| ३. | पुणे | श्रीम.पवनीत कौर, भा.प्र.से., अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका (अति. कार्यभार) | श्रीम.पवनीत कौर, भा.प्र.से., अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका |
| ४. | पिंपरी चिंचवड | श्री. विजय सूर्यवंशी, भा.प्र.से. आयुक्त, (अति. कार्यभार) | श्री. विजय सूर्यवंशी, भाप्रसे, आयुक्त, पिपंरी-चिंचवड महानगरपालिका |
| ५. | ठाणे | श्री. संदिप माळवी, अति. आयुक्त, ठाणे महानगरपालिका | श्री. सौरभ राव, भा.प्र.से., आयुक्त, ठाणे महानगरपालिका |
| ६. | कल्याण डोंबिवली | श्री. अभिनव गोयल, भा.प्र.से. आयुक्त, (अति कार्यभार) | श्री. अभिनव गोयल, भा.प्र.से., आयुक्त, कल्याण -डोंबिवली महानगरपालिका |
| ७. | सोलापूर | श्री. सचिन ओम्बासे, भा.प्र.से. आयुक्त, (अति कार्यभार) | श्री. सचिन ओम्बासे, भा.प्र.से. , आयुक्त, सोलापूर महानगरपालिका |
| ८. | औरंगाबाद/ छ. संभाजीनगर | श्री. अमोल येडगे, भा.प्र.से. आयुक्त, (अति. कार्यभार) | श्री.अमोल येडगे, भाप्रसे, आयुक्त, छ.संभाजीनगर महानगरपालिका |

३. शासन पत्र दि.२७ मार्च,२०२५ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार स्मार्ट सिटीच्या मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही तात्काळ करावी.

४. स्मार्ट सिटी अंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना कार्यमुक्त करुन त्यांचा कार्यभार महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांच्याकडे देण्यात यावा, व दि. ३०.०४.२०२६ पर्यंत शासनास अहवाल सादर करावा.

५. स्मार्ट सिटीची मालमत्ता हस्तांतर केल्यानंतर स्मार्ट सिटी मिशन करिता कंपनी कायद्यानुसार स्थापन करण्यात आलेली कंपनी बंद करण्याची स्वतंत्रपणे कार्यवाही संबंधित स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक. २०२६०४२२१८२९४७४९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUSHILA DHONDIRAM PAWAR

Digitally signed by SUSHILA DHONDIRAM PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=be0660f27b88fa30c14d66b8296a2c28478562c6fd9d1d360094fe11409501d5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D78E8AB53FB3619E69D852CE1492593ABC1DCE1DF4E081AFE790194FB65C97B, cn=SUSHILA DHONDIRAM PAWAR
Date: 2026.04.22 18:31:18 +05'30'

**(सुशिला धों.पवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. अपर मुख्य सचिव (नवि-२) यांचे विशेष कार्य अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित स्मार्ट सिटी
६) आयुक्त, संबंधित महानगरपालिका
७) निवडनस्ती (नवि-३२), नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई